MHNG140001172025

दाखल तारीख–०३/०३/२०२५
नोंदणी तारीख–०३/०३/२०२५
निकाल तारीख–१०/०३/२०२६
कालावधी – ०१ व.०० म.०७ दि.

**पारशिवनी येथील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**

**श्री. जी.ओ.वानखडे यांचे न्यायालयात.**

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६१/२०२५ नि.क्र.१३

| | |
|---|---|
| **प्रस्तुत प्रकरण महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(ई) अन्वये** | |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासनातर्फे,<br>दुय्यम निरिक्षक,<br>राज्य उत्पादन शुल्क ड–१ विभाग<br>ता.पारशिवनी, जि.नागपूर. |
| अभियोग पक्षातर्फे विद्वान विधीज्ञ | श्री. एस. व्ही. तलमले |
| आरोपीचे नाव | राजकुमार रामराव गजभिये,<br>वय – ५४ वर्षे, धंदा –मजूरी<br>रा. मोंढा , कामठी, त. कामठी जि. नागपूर |
| आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ | श्रीमती व्ही. टी. चौधरी |
| अपराध घडल्याची दिनांक | १९/१०/२०२४ |
| एफ.आय.आर. नोंदविल्याची दिनांक | १९/१०/२०२४ |
| न्यायालयात दोषारोप दाखल | ०३/०३/२०२५ |

| | |
|---|---|
| दिनांक | |
| दोषारोप निश्चीत केल्याची दिनांक | २७/०६/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची दिनांक | १२/११/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवण्याची दिनांक | --- |
| न्यायनिर्णयाची दिनांक | १०/०३/२०२६ |
| आरोपीस शिक्षेच्या आदेशाची तारीख | --- |

**<u>आरोपीचा तपशील</u>**

| अनु. क्रं. | आरोपीचे नाव | आरोपीस अटक केल्याची दिनांक | आरोपीस जामीनावर मुक्त केल्याची दिनांक | आरोपीवर निश्चीत केलेले गुन्हयांचे कलम | निर्दोष किंवा दोषी | पारीत आदेश | अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजकुमार रामराव गजभिये | दि. १९/१०/२०२४ रोजी सूचनापत्रावर सोडले | दि. ११/०४/२०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५(ई) अन्वये | निर्दोष | आरोपीची निर्दोष मुक्तता | --- |

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्ष नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी</u>**

| अनुक्रमणिका | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | ललीत चांगदेव जुमनाके | फिर्यादी व नमुना वाहक |

| | | |
|---|---|---|
| २. | सुरेश हेमंत राजगडे | तपास अधिकारी |

**आरोपीतर्फे साक्ष नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी**

| अनुक्रमणिका | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| – | – | – |

**अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या निशाणी**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | सा.क्र.१, नि.क्र.१३ | फिर्यादी याचा शपथेवर पुरावा |
| २. | सा.क्र.१, नि.क्र.व १६ व १७ | एफ.आय.आर व रासायनिक परिक्षणाकरिता पत्र |
| ३. | सा.क्र.२, नि.क्र.१३, | दाखल अधिकारी यांचा शपथेवर पुरावा |
| ४. | सा.क्र.२, नि.क्र.१८ व १९ | झडती पंचनामा, आरोपीची चेहरेपट्टी |
| ५. | सा.क्र.२, नि.क्र.२० | सूचनापत्राची प्रत |

**आरोपीतर्फे नोंदविण्यात आलेल्या निशाणी क्रमांक**

| अनुक्रमणिका | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायनिर्णय

(दिनांक १० मार्च, २०२६ रोजी अधिघोषीत)

प्रस्तुत प्रकरणी आरोपी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९

च्या कलम ६५(ई) अन्वये दोषपात्र गुन्हयांच्या संपरीक्षेस सामोरे जात आहे.

**२.** आरोपी विरुध्द नि.क्र.१३ प्रमाणे गुन्हयाचा तपशील नोंदविला व आरोपीला त्याच्या मातृभाषेत मराठीत वाचुन दाखविला. आरोपीने सदर आरोप मान्य नसल्याचे सांगीतले व संपरीक्षा करण्याची विनंती केली. आरोपीचे भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ अन्वये बयान नोंदविले व आरोपीने खोटी केस असल्याबाबत कथन केले.

**३.** अभिलेखावरील दस्त याचे अवलोकन व दोन्ही पक्षाचे म्हणने ऐकल्यानंतर माझे समक्ष न्यायनिर्णयाकरीत खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात त्यावर कारणमिमांसेच्या आधारावर निष्कर्ष नोंदविण्यात आले.

| **अ.क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय, १९/१०/२०२४ रोजी मौजा महादुला, ता.पारशिवनी जि. नागपूर येथे आरोपीच्या ताब्यातून राहत्या घराची छडती घेतली असता देशी दारू प्रत्येकी १८० एम.एल. क्षमतेच्या २३ निपा अवैधरित्या दारू मिळुन आली? | नाही |
| २. | आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. ०१ करीता</u>**

**४.** आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(अ) अन्वये गुन्हा सिध्द करण्याकरीता आरोपीने अधिनियमातील तरतुदीचे किंवा तद्न्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा

विनिमयाचे किंवा तद्न्वय दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा तद्न्वये दिलेल्या अनुज्ञप्तीचे, परवान्याचे, पासाचे किंवा प्रधिकार पत्राचे उल्लंघन करुन कोणतेही मादक द्रव्य (अफु व्यतिरिक्त) किंवा भांग विकले किंवा देशी दारू विकत घेतले किंवा जवळ बाळगले पाहिजे.

**५.** अभियोगपक्षातर्फे आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी दोन साक्षीदार तपासण्यात आले. राजेश नरोले, उमेश वाघमारे यांना साक्ष समंन्स तामील होवुन सुध्दा ते साक्ष देणेकामी न्यायालयासमक्ष उपस्थीत झाले नाही. करीता नि.क्र.०१ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**६.** अभियोगपक्षातर्फे विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. तलमले आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्रीमती व्ही. टी. चौधरी यांचा यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**७.** जुमनाके (सा.क्र.१) यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन केले आहे की, ते दि. १९/१०/२०२४ रोजी रा.उ.शु.ड विभाग पारशिवनी येथे जवान पदावर कार्यरत होते त्या रोजी खबर मिळाली की आरोपी हा त्याच्या राहत्या घरी तामसावाडी सिंगोरी येथे अवैध्यरित्या दारु विक्री करीत आहे. त्यावरुन एस. एच. राजगडे, व पंचासह आरोपीच्या घरी गेले. आरोपी तेथे दारु विक्री करतांना मिळून आला. एस. एच. राजगडे यांनी पंचनामा केला. देशी दारु भिंगरीच्या १३ निपा १८० मि.ली. क्षमतेच्या मिळून आले. घटनेची फिर्याद त्याने नोंदविली. सदर साक्षीदाराने उलटतपासात असे कबूल केले की आरोपीचा घराचा क्रमांक सांगत येणार नाही. तामसवाडी व सिंगोरी हे दोन वेगवेगळे गाव आहेत.

८. राजगडे (सा.क्र.२) यांनी सरतपासात असे कथन केले आहे

की, दि. १९/१०/२०२४ रोजी रा.उ.शु.ड विभाग पारशिवनी येथे दुय्यम निरीक्षक पदावर कार्यरत होते. त्या रोजी खबर मिळाली की आरोपी हा त्याच्या राहत्या घरी तामसावाडी सिंगोरी येथे अवैध्यरित्या दारु विक्री करीत आहे. त्यावरुन दोन पंचाना कार्यालयात बोलावून घेतले. दोन पंच, जवान व ते तामसवाडी सिंगोरी येथे आरोपीच्या घरी गेले. आरोपी तेथे बसलेला दिसला. आरोपीच्या घराची झडती घेतली असता पलंगाच्या खाली देशी दारु भिंगरीच्या १३ निपा १८० मि.ली. क्षमतेच्या मिळून आले. आरोपीला परवाना असल्याबद्दल विचारले असता परवाना नसल्याचे सांगितले. पंचासमक्ष मुद्देमाला जप्त केला. दोन बॉटल नमूना म्हणून वेगळ्या सिल केल्या. जप्त नमूना रासायनिक परिक्षणाकरीता पाठविला. घटनेची फिर्याद त्यांनी नोंदविली. घटनास्थळ पंचनामा जवान यांनी तयार केला होता. आरोपीचे घर सिंगोरी गावी होते. सदर साक्षीदाराने उलटतपासात असे कबूल केले की, आरोपीचा घराचे दस्त प्राप्त केले  नाही.

९. प्रस्तुत प्रकरणात सर्वात महत्वाची बाब म्हणजे आरोपीच्या ताब्यातुन मादक द्रव्य मिळुन आले पाहिजे, सदर बाब सिध्द करण्याकरीता जप्ती पंचनामा हा सर्वात महत्वाचा पुरावा आहे. जर अभियोगपक्षाच्या कथनानुसार मादक द्रव्य आरोपीच्या ताब्यातुन जप्त झालेले आहे असे स्वीकारले तर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, कलम १०३ अन्वये ''या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अन्वये चाललेल्या खटल्या तद्विरुध्द सिध्द करण्यात येईपर्यंत आरोपी व्यक्तीने जे जवळ बाळगण्याबद्दल त्यास समाधानकारक रितीने कारण दाखविता येत नाही असे कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले किंवा काकवी याबाबत अथवा अशी कोणतीही दारु गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे याबाबत (अथवा कोणतेही मादक द्रव्य तयार करण्यासाठी त्यांच्यावर कोणतेही प्रक्रिया करण्यात आली आहे) किंवा च्यापासुन एखादे मादक द्रव्य तयार करण्यात आले आहे असे

कोणतेही साहित्य याबाबत या अधिनियमाखाली अपराध केला आहे असे अधिक पुराव्यावाचुन गृहित धरण्यात येते''.

**१०.** अभियोग पक्षास या दोन गोष्टी सिध्द करणे सर्वात महत्वाचे आहे त्या म्हणजे द्रव्य आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आले व ते द्रव्य मादक द्रव्य होते. उपरोक्त पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर असे दिसुन येते की, जप्ती पंचनामा स्वतंत्र साक्षीदारांमार्फत सिध्द झाला नाही. जप्त मुद्देमालाचा रासायणीक परीक्षण अहवाल अभिलेखावर नाही तसेच पंचनाम्यामध्ये जप्त दारुच्या बॉटलचे बॅच नंबर, लॉट नंबर, नाही. याकारणास्तव अभियोगपक्षाने शंकेपलीकडे जावुन हे सिध्द केले नाही की, आरोपीच्या ताब्यातुन द्रव्य मिळुन आले व ते द्रव्य मादक द्रव्य होते, त्यामुळे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम १०३ प्रमाणे गृहितकाचे अवलंब करीता येणार नाही. त्यामुळे, आरोपी विरुध्द गुन्हा शाबीत करण्याकरीता साक्षीदार क्र.१ व २ याच्या पुराव्यावर विसंबुन आरोपीविरुध्द आरोप सिध्द होत नाही. त्याकारणाने, आरोपी हा अवैधरीत्या देशी दारु बाळगतांना मिळुन आला हे शंकेपलीकडे सिध्द होत नाही.

**११.** उपरोक्त चर्चेअंती मी या निष्कर्षास आलो आहे की, आरोपी विरुध्द असलेला आरोप सिध्द होण्याकरीता पुरेसा विश्वसनिय पुरावा अभिलेखावर आलेला नाही. घटनेच्या दिवशी आरोपी हा कोणते मादक द्रव्य बाळगतांना मिळुन आला हे सबळ पुराव्याचे आधारे सिध्द होवु शकले नाही. वरिल सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ करिता खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी राजकुमार रामराव गजभिये याची भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २८७ (१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी

कायदयाच्या कलम ६५(ई) नुसार शिक्षापात्र असलेल्या गुन्हयांच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक व जमानत पत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल देशी दारू प्रत्येकी १८० एम.एल. क्षमतेच्या १३ सिलंबद निपा याचिका कालावधित संपूष्टात आल्या नंतर विल्लेवाट लावण्याकामी राज्य उत्पादक शूल्क, पारशिवनी यांच्याकडे सूपूर्त करण्यात याव्या.

४. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम कलम ४८१ च्या तरतुदीच्या पुर्ततेसाठी आरोपीने रु.१५,०००/– हजाराचा वैयक्तीक जातमुचलका व तेवढयाच रक्कमेचा जामीन मुचलका दयावा.

(न्यायनिवाडा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.03.11 13:50:18 +0530

(**जी. ओ. वानखडे**)

दि.१०/०३/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पारशिवनी.

# <u>शेरा</u>

मी शपथेवर सांगतो की, या पि.डी.एफ. न्यायनिवाडा फाईल मधील मजकुर मुळ न्यायनिवाडयातील मजकुराचे शब्द नी शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव :– अ.भी. तामगाडगे ( ग्रेड – ३ )

कोर्टाचे नावः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पारशिवनी